अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । मंगळवार
१.०९.२०२६

# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २१३ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## स्कुटीच्या सीटखाली किलोभर अंमली पदार्थ

### पोलिसांनी सापळा रचला, ११ लाखांच्या मुद्देमालासह एकास अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**जळगाव** – जळगाव शहर पोलिसांनी याप्रकरणी संबंधित आरोपीविरोधात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून, या कारवाईमुळे अमली पदार्थ विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

एकीकडे राज्यात नशामुक्त महाराष्ट्र अभियान सुरू करण्यात आलं असून मुंबई, पुण्यासारख्या शहरांतून मोठ्या प्रमाणात ड्रग्ससंदर्भातील कारवाया सुरू आहेत. मात्र, दुसरीकडे ड्रग्ज विक्रीचे रॅकेट हे महाराष्ट्राच्या दूरपर्यंतच्या जिल्ह्यातही पोहोचल्याचं दिसून येत आहे. जळगाव शहरात अमली पदार्थांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचत पोलिसांनी एका तरुणाला ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून एमडी आणि एफेड्रीनसारखा अमली पदार्थ, मोबाईल फोन तसेच दुचाकी असा एकूण सुमारे ११ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, स्कुटीच्या सीटखाली लपवून ह्या अंमली पदार्थांची विक्री केली जात होते.

जळगाव शहर पोलिसांनी याप्रकरणी संबंधित आरोपीविरोधात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून, या कारवाईमुळे अमली पदार्थ विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. जळगावातील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला अमली पदार्थ विक्रीसाठी एक व्यक्ती येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. त्याच्या झडतीदरम्यान सुमारे ११ ग्रॅम एमडी, तब्बल १ किलो ९६३ ग्रॅम एफेड्रीन, दोन मोबाईल फोन आणि एक सुझुकी बर्गमन दुचाकी असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. विशेष म्हणजे, या दुचाकीच्या सीटखालीच हे ड्रग्ज लपवण्यात आले होते, दरम्यान, जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे ११ लाख १७ हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. याप्रकरणी जळगाव शहर पो-लीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, स्थानिक गुन्हे शाखेकडून पुढील तपास सुरू आहे.

---

कॅबिनेट बैठकीवर तुकाराम मुंढेंचा प्रभाव

## एकनाथ शिंदेंच्या अनुपस्थितीत ४ धडाकेबाज निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (१ सप्टेंबर) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार देखील उपस्थित होत्या. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही कारणास्तव उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गैरहजर होते.

या मंत्रिमंडळाच्या बैठकीत चार महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कारवाईचा प्रभाव आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाहायला मिळाला. शासकीय-निमशासकीय बैठका, कार्यक्रमांच्या दरम्यान तसेच उपहारगृहात आरोग्यदायी अन्नपदार्थ ठेवण्याच्या धोरणाला आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता दिली आहे.

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत सरकारने घेतलेले ४ महत्वाचे निर्णय नशा मुक्त भारत अभियानात महाराष्ट्राचे पुढचे पाऊल. सन २०२९ पर्यंत महाराष्ट्रातून अंमली पदार्थाचे समूळ उच्चाटन करणार. त्यासाठी राज्य शासनाचे सर्वसमावेशक शासकीय दृष्टिकोन शासकीय-निमशासकीय बैठका, कार्यक्रमांच्या दरम्यान तसेच उपहारगृहात आरोग्यदायी अन्नपदार्थ ठेवण्याच्या धोरणाला मान्यता. संतुलित मेन्यू ठेवणे बंधनकारक (सार्वजनिक आरोग्य विभाग) सोलापूर शहरातील जुना पुणे नाका ते बोरामणी नाका दरम्यान उन्नत मार्ग प्रकल्प निकडीचा सार्वजनिक प्रकल्प म्हणून घोषित.

यामुळे राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ वरील हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक शासकीय जमीन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणास हस्तांतरित होण्याचा मार्ग मोकळा. (सार्वजनिक बांधकाम विभाग) पुणे जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पासाठी ५ हजार ७०४ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंजुरी. सुमारे १ लाख ४४ हजार ९१२२ हेक्टर क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी मिळणार. (जलसंपदा विभाग)

---

## थोडक्यात

### रुग्णालयातील जेवणात सापडले झुरळः ठेकेदारावर फौजदारी कारवाईची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**ठाणे** – ठाणे महानगरपालिकेच्या कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय पुन्हा एकदा गंभीर निष्काळजी पणामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या एका रुग्णाला देण्यात आलेल्या रात्रीच्या जेवणात झुरळ आढळल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. मनसेचे जनहित व विधी विभागाचे ठाणे शहर अध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर आणि पदाधिकाऱ्यांनी हा धक्कादायक प्रकार प्रत्यक्ष उघडकीस आणला असून, यामुळे रुग्णालय प्रशासनाचा हलगर्जीपणा आणि गलथान कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

---

## एमपीएससीतील वरिष्ठ अधिकाऱ्यानेच पुतण्यासाठी पेपर फोडला

### प्रेमाचा अँगल दाखवून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न

### ऋषिकेश गांगुर्डेंचा गंभीर आरोप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – राज्यात नीटनंतर एमपीएससी परीक्षेचा पेपर फुटल्याने विद्यार्थ्यांकडून मोठा संताप व्यक्त होत आहे. दुसरीकडे पोलिसांनी याप्रकरणी कारवाई करत ६ आरोपींना अटक केली असून एका वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यालाही अटक करण्यात आलीय. मात्र, या पेपरफुटीनंतर ह्या पेपरफुटीत प्रेमाचा अँगल असल्याची बाब समोर आली होती.

मात्र, प्रेमाचा अँगल दाखवण्याचा प्रकार म्हणजे हे प्रकरण दडपण्याचा डाव असल्याचा आरोप होत आहे. एमपीएससी पेपर फुटीप्रकरणाला प्रेमाचा अँगल दाखवून प्रकरण दडपण्याचा प्रकार सुरू आहे. ह्यात प्रेमाचा अँगल नाही तर मास पेपरफुटीचा प्रकार आहे, असे म्हणत एमपीएससी पेपर फुटीसंदर्भातील तक्रारदार ऋषिकेश गांगुर्डे यांनी महत्त्वाचं भाष्य केलंय.

पोलिसांनी चोर सोडून संन्यासाला पकडण्याचा प्रकार केला आहे. जो गौरव पाटील पेपरफुटी प्रकरणात माझ्यासोबत तक्रार द्यायला होता तो कसा काय आरोपी असू शकेल? तो आणि मी तुकाराम मुंढे यांना भेटून तक्रार दिली आणि त्यानंतर एमपीएससी आयोगात येऊन लेंडवे नावाच्या अधिकाऱ्याला भेटलो. तो पेपरफुटीचा मास्टरमाईड आहे, असा गांगुर्डे यांनी म्हटले. पायल किंवा तिच्या घरातल्या व्यक्तीने पेपर फोडलेला नाही, पेपर हा ज्या नकाते नावाच्या अधिकाऱ्याला अटक झाली आहे, त्याने आपल्या पुतण्यासाठी फोडला आहे.

---

## देहूरोडमध्ये किरकोळ वाद अन मध्यरात्री गाड्या पेटवल्या

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**पुणे** – देहूरोड उड्डाणपुलाखाली असलेल्या 'बबलू गॅरेज' बाहेर ग्राहकांच्या दुरुस्तीसाठी आलेल्या दुचाकी उभ्या होत्या. देहूरोड परिसरातून एक खळबळजनक बातमी समोर येत आहे.

गाडी चोरी करू दिली नाही या रागातून एका अज्ञात इसमाने मध्यरात्री गॅरेजबाहेरील दुचाकी पेटवून दिल्याची घटना घडली आहे. देहूरोड उड्डाणपुलाखाली असलेल्या 'बबलू गॅरेज' बाहेर ग्राहकांच्या दुरुस्तीसाठी आलेल्या दुचाकी उभ्या होत्या. यापूर्वी हा अज्ञात आरोपी गॅरेजबाहेरील दुचाकीवर हात साफ करत असताना गॅरेज मालक बबलू गुप्ता यांनी त्याला रंगेहात पकडले होते आणि त्या वेळी त्याला सोडूनही दिले होते. मात्र, याच गोष्टीचा राग मनात धरून मध्यरात्री नशेत आलेल्या या इसमाने गॅरेजबाहेर पार्क केलेल्या दुचाकी पेटवून दिल्या. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली.

या आगीत ग्राहकांच्या गाड्यांचे मोठे नुकसान झाले आहे. घटना घडल्यानंतर तक्रार घेऊन गेलेल्या गॅरेज मालकाला केवळ शंकेवरून तात्काळ अटक करता येत नसल्याचे सांगत देहूरोड पोलिसांनी उद्या कारवाई करू असे म्हणून परत पाठवले. या प्रकरणी संशयित आरोपीला तात्काळ अटक करून कडक कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

---

## अग्निशमन दलाच्या जवानांना अत्याधुनिक गणवेश

### प्रत्येक गणवेशासाठी ७० हजारांचा खर्च

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुंबईतील आगींसह विविध आपत्कालीन परिस्थितीत जीव धोक्यात घालून कर्तव्य बजावणाऱ्या अग्निशमन दलातील २१७६ अधिकारी आणि जवानांना अत्याधुनिक गणवेश मिळणार आहे. कोट, ट्राऊजर, हुड आणि ग्लोव्हज यांसह गणवेश मिळणार असून प्रत्येक गणवेशासाठी ७० हजार रुपये खर्च करण्यात येणार आहे. मुंबई अग्निशमन दलाचे अधिकारी आणि जवान आग लागण्याच्या घटनांबरोबरच रेल्वे अपघात, इमारत कोसळणे, झाडे कोसळणे तसेच विविध ठिकाणी अडकलेल्या नागरिकांची सुटका करण्याच्या मोहिमांमध्ये सहभागी होतात.

अशा मोहिमांदरम्यान त्यांना प्रचंड उष्णता, धूर तसेच अन्य धोकादायक परिस्थितीचा सामना करावा लागतो. त्यामुळे आगीच्या ठिकाणी काम करताना पर्सनल प्रोटेक्टीव्ह इक्विपमेंट परिधान करणे बंधनकारक करण्यात आले आहे.



# शांतिनिकेतन इंग्रजी शाळेत रक्षाबंधन व राखी प्रदर्शन उत्साहात

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*

**वरूड** – स्थानिक शांतीनिकेतन इंग्रजी शाळेत टाकाऊ वस्तुंपासुन विद्यार्थ्यांनी आकर्षक व नाविन्यपूर्ण राख्या साकारल्या. रक्षाबंधन आणि राखी प्रदर्शन अत्यंत उत्साहात पार पडले.




रक्षाबंधनाचा सण आणि इयत्ता१ ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्यांच्या प्रदर्शनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक विवेक ठवळी होते. यावेळी उपमुख्याध्यापिका शालिनी देशमुख सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना राख्या बांधुन रक्षाबंधनाचा आनंद द्विगुणित केला.

राखी प्रदर्शनासाठी इयत्ता १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी विविध टाकाऊ वस्तूंपासुन टिकाऊ, सुंदर व कलात्मक राख्या विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकनेचा व सर्जनशीलतेचा केल्या. सुंदर अविष्कार या राख्यांमधुन सादर केला. परीक्षकांनी सर्व राख्यांचे परीक्षण करुन उत्कृष्ट कलाकुसर, नाविन्यपूर्ण कल्पना आणि आकर्षक रचना असलेल्या राख्यांची निवड केली. उत्कृष्ट राखी तयार करणाऱ्या विदयार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

या उपक्रमातुन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, सर्जनशीलतेला तसेच टाकाऊपासुन टिकाऊ या संकल्पनेला प्रोत्साहन मिळाले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्राजक्ता राऊत हिने मानले. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्विरीत्या पार पडला.

# पाचगणीतील ताईघाट वाहनतळ परिसरात बिबट्याची दहशत

## वनविभागाकडून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

*(प्रतिनिधी वरूड दर्पण)*

**कराड** – जागतिक दर्जाचे सर्वदूर जगप्रसिद्ध असलेल्या महाबळेश्वर-पांचगणी पर्यटन स्थळांवरील पांचगणी येथील तायघाट वाहनतळ, ता.महाबळेश्वर येथे रविवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास बिबट्याचे दर्शन झाल्याने व याची वार्ता वाऱ्यासारखी संपूर्ण पांचगणी परिसरात पसरताच तेथे 'त्या' बिबट्याची चांगलीच दहशत निर्माण झाली आहे. ताईघाट येथील वाहनतळाच्या ठिकाणी असलेल्या वीज वितरणाच्या ट्रान्सफॉर्मर (डीपी) जवळ बिबट्या दिसून आला. यावेळी तेथील स्थानिक रहिवाशी अनिकेत बेलोशे यांच्या निदर्शनास बिबट्या येताच त्यांनी प्रसंगावधान राखून आपल्या मोबाईलमध्ये त्याचे चित्रीकरणासह छायाचित्रणही केले. महाबळेश्वरसह पांचगणी हि दोन्ही निसर्गसौंदर्याने नटलेली पर्यटनस्थळे असल्याने महाबळेश्वरसह पांचगणी परिसर घनदाट वनराईने वेढलेला असल्याने यापूर्वीही विविध वन्यजीवांचा वावर आढळून आला आहे. मात्र,बिबट्याचा वावर आता थेट मानवी वस्तीजवळ तसेच बंगल्यांच्या परिसरापर्यंत वाढत असल्याने ग्रामस्थ आणि पर्यटकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ताईघाट परिसरातील अनेक ठिकाणी बिबट्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्येही कैद झाल्याचे आढळून आले आहे.

# कशेडी बोगद्यातील ९० टक्के पाण्याची गळती नियंत्रित

**राष्ट्रीय महामार्ग विभाग, पेणचे स्पष्टीकरण**

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*

***मुंबई*** – मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील कशेडी घाटातील दुहेरी बोगद्यात पावसाळ्यात आढळलेल्या पाण्याच्या गळतीपैकी सुमारे ९० टक्के गळती नियंत्रित करण्यात आली आहे. पूर्ण झालेल्या मार्गावरून वाहतूक सुरळीत सुरू असल्याचे राष्ट्रीय महामार्ग विभाग, पेण यांनी स्पष्ट केले आहे. कशेडी दुहेरी बोगदा हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील कशेडी घाट विभागाचा भाग आहे. पावसाळ्यात या परिसरातील अतिवृष्टी आणि



भूजल परिस्थितीमुळे दोन्ही बोगद्यांतील काही ठिकाणी किरकोळ पाण्याची गळती आढळली आहे. पाण्याच्या गळतीची तांत्रिक तपासणी करून योग्य उपाययोजना निश्चित करण्यासाठी आयआयटी मुंबईचे प्रा. डी. एन. सिंह यांचा तांत्रिक अहवाल घेण्यात आला.

या शिफारशींनुसार निश्चित केलेल्या ठिकाणी आवश्यक ग्राऊटिंग आणि गनायटिंगची कामे करण्यात आली आहेत. या उपाययोजनांमुळे सुमारे ९० टक्के गळती नियंत्रित झाली असून, उर्वरित ठिकाणांवरील कामे प्रगतीपथावर आहेत. दोन्ही बोगद्यांवर देखरेख ठेवून सुधारात्मक उपाय प्राधान्याने करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या आहेत.

## न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट प्री प्रायमरी येथे रक्षाबंधनाच्या पावन पर्वानिमीत विद्यार्थ्यांनी

# वृक्षांना राखी बांधून अनोख्या पद्धतीने साजरे केले रक्षाबंधन

*(प्रतिनिधी वरूड दर्पण)*

**वरूड** – आज आगळ्या-वेगळ्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे केले. मुलांनी शाळेच्या परिसरातील झाडांना राखी बांधुन वृक्षांचे रक्षण करु, पर्यावरणाचे संवर्धन करु असा संदेश दिला. वृक्ष हे आपले खरे जीवनदाते असुन ते आपल्याला प्राणवायू, सावली, फळे आणि निसर्गाचे संतुलन देतात.



त्यामुळे भावंडांमधील प्रेम व संरक्षणाचा संदेश देणाऱ्या रक्षाबंधनाच्या दिवशी विद्यार्थ्यांनी वृक्षांनाही आपला मित्र व भाऊ मानुन राखी बांधली. यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनाची शपथ घेतली. झाडे लावा, झाडे जगवा आणि पर्यावरणाचे रक्षण करा असा संदेश देत मुलांनी उत्साहाने या उपक्रमात सहभाग घेतला. या अभिनव उपक्रमातुन विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम, पर्यावरणाची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी निर्माण झाली. रक्षाबंधनाचा सण केवळ भावंडांच्या नात्यापुरता मर्यादित न राहता मानव आणि निसर्ग यांच्यातील प्रेमाचे नाते दृढ करणारा ठरला. हा उपक्रम पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संदेश देणारा आहे. अशा 'वृक्षाबंधन' उपक्रमांतुन झाडांच्या संरक्षणाची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जाते. हा कार्यक्रम प्राचार्या माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, प्री प्रायमरीचे कॉर्डिनेटर पराग भोंडे तसेच पीआरओ किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

या कौतुकस्पद उपक्रमाबद्दल संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव शाम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सदस्य विनय यावलकर आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे भरभरुन कौतुक केले. शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादी सर्वांचे या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता मोलाचे सहकार्य लाभले.

# मनसे नेते अमित ठाकरे यांच्याविरोधात गुन्हा

**पंतप्रधानांचे छायाचित्र भिंतीवरून काढले**

*(प्रतिनिधी वरूड दर्पण)*

***पुणे*** – पुण्यातील शिवाजीनगर येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात मनविसेच्या संपर्क मोहिमेदरम्यान मनसेचे युवा नेते अमित ठाकरे यांच्या उपस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे छायाचित्र हटवल्याने महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळात मोठा



वाद निर्माण झाला आहे. शासकीय तंत्रनिकेतन, गणेशखिंड येथील कार्यालयात विनापरवाना प्रवेश करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो काढून नेल्याप्रकरणी अमित ठाकरे यांच्यासह २५ कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, संध्याकाळी या प्रकारानंतर भाजप नेते व कार्यकर्त्यांनी महाविद्यालयात धाव घेतली. पण, त्याआधीच कॉलेज प्रशासनाकडून हा फोटो पुन्हा लावण्यात आला. अमित ठाकरे हे विद्यार्थ्यांच्या विविध समस्या जाणून घेण्यासाठी आणि मनसेच्या सदस्य नोंदणी अभियानासाठी या महाविद्यालयात पोहोचले होते. यावेळी प्राचार्यांच्या दालनात छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्रांच्या शेजारी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे छायाचित्र लावल्याचे एका विद्यार्थ्याने अमित ठाकरे यांच्या निदर्शनास आणून दिले.

# मुंबईकडे जाण्याची तयारी करा : जरांगेंचे मराठा समाजाला आवाहन

*(प्रतिनिधी वरूड दर्पण)*

***जालना*** – मराठा आरक्षणाच्या मागण्या १२ सप्टेंबरपर्यंत पूर्ण न झाल्यास मुंबईत भव्य आंदोलन उभारण्यासाठी मराठा समाजाने 'गनिमी कावा' वापरून शांततेत मुंबईकडे कूच करावे, असे आवाहन मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी सोमवारी केले. अंतरवाली सराटी येथे जरांगे-पाटील यांच्या आमरण उपोषणाचा सोमवारी तिसरा दिवस



होता. रक्तातील साखरेचे प्रमाण कमी झाल्याने डॉक्टरांनी वैद्यकीय उपचारांचा सल्ला दिला असला, तरी त्यांनी 'आयव्ही फ्लुइड्स' (सलाईन) घेण्यास नकार दिला आहे. 'माझा उपोषणादरम्यान मृत्यू झाला, तरी माझा मृतदेह आंदोलनासाठी मुंबईतच घेऊन जा, असा भावनिक हाक त्यांनी समर्थकांना दिली. आंदोलनस्थळी उपस्थितांना संबोधित करताना जरांगे पाटील म्हणाले, मुंबईला जाताना समाजाने गनिमी कावा वापरावा. वाहनांवर झेंडे लावू नका. आतापासूनच शांततेत मुंबईच्या दिशेने जाण्यास सुरुवात करा. आपण मुंबईत पोहोचलो आहोत हे प्रशासनाला समजणार नाही, अशा प्रकारे गुप्तता पाळा. आझाद मैदान किंवा मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याबाहेर थेट गर्दी करण्याऐवजी मुंबईतील नातेवाईक, मित्र आणि परिचितांच्या घरी आश्रय घ्यावा, असा सल्ला त्यांनी दिला.

# ग्रामीण भागात शाळेतील कर्मचाऱ्यावर विनयभंगाचा आरोप

**२२ अल्पवयीन विद्यार्थिनींच्या तक्रारीनंतर अटक**

*(प्रतिनिधी वरूड दर्पण)*

***ठाणे*** – ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात आदिवासी आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यावर २२ अल्पवयीन विद्यार्थिनींनी विनयभंगाचा आरोप केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

विद्यार्थिनींच्या तक्रारीनंतर पोलिसांनी संबंधित कर्मचाऱ्याला अटक केली आहे. गणपत गवळी असे आरोपीचे नाव आहे. तो शहापूर तालुक्यातील टेंभे येथील आदिवासी आश्रमशाळेत काम करत होता. मिळालेल्या माहितीनुसार, इयत्ता सहावी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनींनी गणपत गवळीविरोधात गंभीर आरोप केले आहेत. दुपारचे किंवा रात्रीचे जेवण झाल्यानंतर विद्यार्थीनी आपली ताटे आणि इतर भांडी ठेवण्यासाठी स्वयंपाकघरात जात असत. त्यावेळी आरोपी त्यांना वारंवार अयोग्य पद्धतीने स्पर्श करत असल्याचा आरोप



विद्यार्थिनींनी केला आहे.

या प्रकारामुळे विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर विद्यार्थिनींनी या प्रकाराची माहिती दिल्यानंतर प्रकरण समोर आले. त्यानंतर पोलिसांनी तक्रारीची दखल घेत आरोपी गणपत गवळीविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून, विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळा प्रशासनाकडूनही आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

# परवानगी नाकारल्याने आजचा ओबीसी मोर्चा रद्द : नवनाथ वाघमारे

*(प्रतिनिधी वरूड दर्पण)*

***मुंबई*** – आज निघणारा 'ओबीसी' मोर्चा रद्द करण्यात आल्याची माहिती ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी दिली आहे. मुंबईतल्या आझाद मैदानावर होणाऱ्या मोर्चाला आझाद मैदान पोलिसांनी कायदेशीररीत्या परवानगी नाकारली आहे. याच पार्श्वभूमीवर वाघमारेंनी मोर्चा रद्द करण्याचे आवाहन केले होते. या मोर्चासाठी राज्यभरातून ओबीसी समाज बांधव सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र या परवानगी नाकारल्यानंतर हा मोर्चा कायद्याच्या विरोधात होईल, अशा मोर्चात सहभागी झाल्यास ओबीसी समाजातील



गोरगरीब नागरिक आणि नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या तरुणांवर पोलिसांकडून गुन्हे दाखल होण्याची शक्यता असल्याचेही वाघमारे म्हणाले.

# सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करा

*(प्रतिनिधी वरूड दर्पण)*

***पुणे*** – 'पुण्यामध्येच ही क्षमता आहे की संपूर्ण उत्सव सांस्कृतिक पद्धतीने साजरा केला पाहिजे आणि हे फक्त पुणेकरच करू शकतात. त्यामुळे माझे पुणेकरांना आवाहन आहे की, डीजेमुक्त उत्सवाच्या वादात न पडता संपूर्ण सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव कसा साजरा होतो, हे पुणेकरांनी संपूर्ण महाराष्ट्राला दाखवून दिले पाहिजे', असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे केले. पुण्यातील गणेश कला क्रीडा मंच येथे भाजपची प्रदेश कार्यकारिणीची बैठक पार पडली.

**मुख्यमंत्री फडणवीसांचे पुणेकरांना आवाहन**



बैठकीच्या समारोप प्रसंगी फडणवीस बोलत होते. पुण्यामध्ये डीजेमुक्त गणेशोत्सवावरून गणेश मंडळांचे कार्यकर्ते आणि पुण्यातील नागरिक यांच्यामध्ये वादंग निर्माण झाला आहे. त्याचा संदर्भ देत फडणवीस म्हणाले, 'मी ज्यावेळेस इथून बाहेर पडेन तेव्हा मीडिया मला पुण्याच्या संदर्भात एकच प्रश्न नक्की विचारणार आहे की, तुम्ही गणेशोत्सवाचे बोललात, मग गणेशोत्सवामध्ये डीजे वाजला पाहिजे की नाही? त्याचा उल्लेख करून फडणवीस यांनी कोणत्याही वादात न पडता पुणेकरांनी संपूर्ण सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले.





# संपादकीय

**कधीकधी शांत राहणेही गरजेचे असते, प्रत्येक प्रश्नाचे उत्तर शोधत बसू नये.**

## इराण युद्धामुळे अब्जाधीश ठरलेला उद्योगपती : युद्धातून नफा कमावणाऱ्या अर्थकारणाचे वास्तव

'युद्धात कुणाचा विजय होतो, कुणाचा पराभव होतो; पण काहींची संपत्ती मात्र प्रचंड वाढते,' असे म्हटले जाते. इराणशी संबंधित संघर्ष आणि पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे जागतिक बाजारपेठेत तेलाच्या किमतींमध्ये झालेली वाढ अनेक ऊर्जा कंपन्यांसाठी वरदान ठरली. अशाच परिस्थितीत नायजेरियातील उद्योगपती अलिको डांगोटे यांची संपत्ती झपाट्याने वाढल्याने ते पुन्हा चर्चेत आले. एका युद्धामुळे एखादा व्यक्ती अब्जाधीश बनतो, ही गोष्ट प्रथमदर्शनी धक्कादायक वाटते; मात्र त्यामागील अर्थकारण समजून घेतल्यास जागतिक व्यवस्थेचे वेगळेच चित्र समोर येते.

युद्ध आणि बाजारपेठेचे नाते इराण हा जगातील महत्त्वाचा तेल उत्पादक देश आहे. पश्चिम आशियातील कोणताही संघर्ष तेलपुरवठ्यावर परिणाम करू शकतो, अशी भीती बाजारपेठेला नेहमीच असते. युद्धाचा धोका वाढला की व्यापारी भविष्यात तेलटंचाई होईल या अपेक्षेने मोठ्या प्रमाणावर खरेदी करतात. परिणामी आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढतात. या वाढीचा सर्वाधिक फायदा तेल उत्पादक देशांतील कंपन्या, रिफायनरी उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणूकदारांना होतो. म्हणजेच युद्धाचा थेट संबंध नसतानाही हजारो किलोमीटर दूर असलेल्या उद्योगपतींच्या संपत्तीत कोट्यवधी डॉलर्सची भर पडू शकते. कोण आहेत अलिको डांगोटे?

अलिको डांगोटे हे आफ्रिकेतील सर्वात श्रीमंत उद्योगपती म्हणून ओळखले जातात. नायजेरियातील त्यांचा डांगोटे ग्रुप सिमेंट, साखर, खत, तेलशुद्धीकरण आणि विविध उद्योगांमध्ये कार्यरत आहे. विशेषतः त्यांनी उभारलेली जगातील सर्वात मोठ्या सिंगल-ट्रेन रिफायनरींपैकी एक असलेली डांगोटे रिफायनरी हा त्यांच्या व्यवसायाचा सर्वात मोठा टप्पा ठरला. ही रिफायनरी सुरू झाल्यानंतर नायजेरियाची आयात कमी होण्यास मदत झाली, तर इंधन निर्यातीची क्षमता वाढली. त्यामुळे तेलाच्या वाढत्या किमतींचा त्यांच्या उद्योगाला मोठा फायदा झाला. आंतरराष्ट्रीय बाजारातील त्यांच्या कंपनीचे मूल्य वाढल्याने त्यांच्या वैयक्तिक संपत्तीतही मोठी भर पडली. युद्धातून निर्माण होणारी आर्थिक संधी युद्धामुळे काही उद्योगांना मोठा फटका बसतो, तर काही उद्योग भरभराटीला येतात. युद्धकाळात सर्वाधिक फायदा होणाऱ्या क्षेत्रांमध्ये संरक्षण उद्योग, ऊर्जा क्षेत्र, जहाज वाहतूक, विमा उद्योग आणि काही वित्तीय संस्था यांचा समावेश होतो. दुसरीकडे पर्यटन, विमान वाहतूक, लघुउद्योग आणि सामान्य ग्राहक मात्र महागाईच्या ओझ्याखाली दबले जातात. याच विरोधाभासामुळे युद्धाचे अर्थकारण नेहमीच चर्चेचा विषय राहिले आहे. सामान्य माणसावर परिणाम तेलाच्या किमती वाढल्या की त्याचा परिणाम केवळ पेट्रोल-डिझेलपुरता मर्यादित राहत नाही. वाहतूक खर्च वाढतो. अन्नधान्य महाग होते. उत्पादन खर्च वाढतो. महागाईचा दर चढतो. सर्वसामान्यांच्या खिशावर अतिरिक्त भार पडतो. म्हणजे एका बाजूला उद्योगपतींची संपत्ती वाढत असताना दुसऱ्या बाजूला सामान्य नागरिकांना वाढत्या खर्चाचा सामना करावा लागतो.

# स्व.मधुकर ठाकरे : आदर्श शिक्षक, कर्तृत्ववान मुख्याध्यापक

स्वर्गीय श्री.मधुकरराव ठाकरे दादा यांच्या दुःखद निधनाची वार्ता कळताच मन अत्यंत व्यथित झाले. वयाच्या ९२व्या वर्षी २१ ऑगस्ट रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने ठाकरे परिवाराने केवळ कुटुंबप्रमुख गमावला नाही तर एक आदर्श शिक्षक, कर्तृत्ववान मुख्याध्यापक, शिक्षक संघटनेचे मार्गदर्शक, समाजहितैषी आणि सर्वांना आपलेसे करणारे आधारवड गमावला आहे.



स्व.मधुकरराव ठाकरे दादा यांनी आपल्या आयुष्यात तब्बल ४० वर्षे शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. आपल्या कार्यकाळात त्यांनी आदर्श शिक्षक आणि जि.प.मुख्याध्यापक म्हणून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, ही त्यांच्या प्रामाणिक, निष्ठावान आणि समर्पित सेवेला मिळालेली योग्य पावती होती. शिक्षणक्षेत्रातून निवृत्त होऊन तब्बल ३३ वर्षे लोटली असली, तरी त्यांचे शिक्षणाशी आणि शिक्षकांशी असलेले नाते कधीही संपले नाही. ते शिक्षक संघाचे मार्गदर्शक म्हणून दीर्घकाळ कार्यरत राहिले. अनुभव, अभ्यास, शिस्त आणि माणुसकीच्या बळावर त्यांनी असंख्य शिक्षकांना योग्य दिशा दिली. अनेकांसाठी ते केवळ मार्गदर्शक नव्हते, तर अडचणीच्या काळात विश्वासाने धावून जाता येईल असा हक्काचा आधार होते.

दादांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे साधेपणा, शिस्त, प्रामाणिकपणा, कष्ट, विवेक आणि माणुसकी यांचा सुंदर मिलाफ होता. त्यांनी आयुष्यभर स्वतःच्या कर्तृत्वाला कधीही मोठेपणाचा आव आणला नाही. उलट, आपल्या कार्यातून आणि आचरणातून त्यांनी समाजात आदराचे स्थान निर्माण केले. सर्वांना मार्गदर्शन करणे, योग्य सल्ला देणे आणि प्रत्येकाला आपुलकीने जोडून ठेवणे हा त्यांच्या स्वभावाचा अविभाज्य भाग होता.

त्यांच्या जीवनातील सर्वात मोठे कार्य म्हणजे त्यांनी आपल्या परिवाराला दिलेले संस्कार. कुटूंबाला एकसंघ बांधून ठेवणारा भक्कम आधारवड म्हणून त्यांनी संपूर्ण परिवाराला प्रेम, शिस्त, शिक्षण आणि संस्कारांच्या धाग्याने जोडून ठेवले. आज त्यांच्या पश्चात परिवारातील सदस्यांनी विविध क्षेत्रांत मिळवलेले यश हे त्यांच्या संस्कारांचे आणि दूरदृष्टीचे जिवंत उदाहरण आहे.

त्यांचे दोन सुपुत्र व दोन सुना शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत. एका सुपुत्राने वरिष्ठ लिपिक म्हणुन जबाबदारी सांभाळली आहे. पुढील पिढीतील नातवंडांनीही उच्च शिक्षण आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. एक नातू एमबीबीएस, एम.डी.डॉक्टर, दोन नातवंडे अभियांत्रिकी क्षेत्रात तर एका नातवंडाने आयआयएम मुंबई येथून एमबीए करुन डिव्हिजनल मॅनेजर म्हणुन जबाबदारी स्वीकारली आहे. संपूर्ण परिवाराची ही शैक्षणिक व व्यावसायिक प्रगती पाहता, 'संस्कारांची खरी श्रीमंती काय असते?' याचे उत्तम उदाहरण म्हणजे ठाकरे परिवार होय.

दादांनी आयुष्यभर जपलेल्या मूल्यांचे प्रतिबिंब त्यांच्या संततीच्या कर्तृत्वात दिसते. त्यांनी आपल्या पुढील पिढीला केवळ शिक्षण दिले नाही तर शिक्षणाबरोबर संस्कार, कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, माणुसकी आणि समाजाप्रतीची बांधिलकी दिली. म्हणुनच त्यांचे जीवन हे केवळ एका व्यक्तीचे जीवन न राहता एका संपूर्ण परिवाराला घडविणारे आणि समाजाला दिशा देणारे प्रेरणादायी पर्व ठरले.

आज दादा देहाने आपल्यात नाहीत त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. घरातील प्रत्येक व्यक्तीला त्यांचे प्रेम, मार्गदर्शन आणि मायेची उणीव जाणवत राहील परंतु त्यांनी आयुष्यभर केलेले कार्य, दिलेले संस्कार, घडविलेली संतती, शिक्षकांना दिलेले मार्गदर्शन आणि समाजात निर्माण केलेला स्नेहभाव यामुळे ते देहाने दूर गेले असले तरी विचारांनी आणि संस्कारांनी सदैव आपल्या सोबत राहतील.

काही माणसे निवृत्त होतात पण त्यांच्या कार्याची निवृत्ती कधीच होत नाही काही माणसे काळाच्या पडद्याआड जातात पण त्यांच्या संस्कारांचा प्रकाश पुढील अनेक पिढ्यांना उजळत राहतो. स्व.मधुकरराव ठाकरे दादा हे त्यापैकीच एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते.

त्यांचे ९२ वर्षांचे समृद्ध जीवन, ४० वर्षांची निष्ठावान शैक्षणिक सेवा, आदर्श मुख्याध्यापक म्हणुन केलेले कार्य, शिक्षक संघटनेला दिलेले मार्गदर्शन, समाजातील प्रत्येकाशी जपलेले जिव्हाळ्याचे संबंध आणि आपल्या परिवाराला दिलेले उच्च संस्कार हीच त्यांच्या जीवनाची खरी कमाई आणि अमूल्य वारसा आहे, असे हे आदर्श शिक्षक, कर्तृत्ववान मुख्याध्यापक, सर्वांचे मार्गदर्शक आणि ठाकरे परिवाराच्या भक्कम आधारवडाला विनम्र अभिवादन!

माजी आमदार डॉक्टर प्राध्यापक श्रीकांत देशपांडे, संस्थापक अध्यक्ष यांच्या वतीने व

ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती प्रदान करो आणि संजय ठाकरे, प्रशांत ठाकरे तसेच संपूर्ण ठाकरे परिवाराला हे अपार दुःख सहन करण्याचे बळ, धैर्य आणि मनोबल देवो, हीच परमेश्वराच्या चरणी मनःपूर्वक प्रार्थना.



**सुधाकर ऊर्फ भाऊसाहेब खडसे**
**जिल्हाध्यक्ष,**
**कास्टस्ट्राईब शिक्षक आघाडी संघटना, अमरावती**

# सावधान पालकांनो...मोबाईलमुळे मुलं-मुली प्रेमाच्या जाळ्यात अडकत आहेत!

## वेळीच लक्ष द्या... आपल्या लेकरांचे मोबाईल तपासा... पुढील अनर्थ टळेल!

आजच्या डिजिटल युगात मोबाईल हा जीवनाचा अभिभाज्य भाग बनला आहे. शिक्षण, माहिती आणि मनोरंजनासाठी मोबाईलचा योग्य वापर निश्चितच उपयुक्त आहे. मात्र, याच मोबाईलच्या अतिरेकामुळे मुलांच्या आयुष्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. विशेषतः किशोरवयीन मुलं-मुली सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स, चॅटिंग आणि अनोळखी व्यक्तींशी संपर्काच्या माध्यमातून चुकीच्या संबंधांच्या जाळ्यात अडकण्याची शक्यता वाढत आहे.

**प्रेमाच्या नावाखाली होते गैरफायदा :-** कधी एखाद्या अनोळखी व्यक्तीची फ्रेंड रिक्वेस्ट, तर कधी सतत होणारे चॅटिंग... सुरुवातीला हे सर्व निरुपद्रवी वाटते. मात्र हळूहळू भावनिक जवळीक निर्माण होते आणि मुलं-मुली पालकांपासून अनेक गोष्टी लपवू लागतात. काही वेळा खोटी ओळख सांगून किंवा प्रेमाच्या नावाखाली मुलांना फसवले जाऊ शकते. अशा प्रकारातून मानसिक त्रास, आर्थिक फसवणूक, ब्लॅकमेलिंग किंवा घरातून पळून जाण्यासारख्या गंभीर घटना घडू शकतात.

**पालकांनी वेळीच लक्ष देणे गरजेचे :-** मुलांच्या हातात मोबाईल देऊन पालकांनी आपली जबाबदारी संपली असे समजू नये. मुलं मोबाईलवर काय पाहतात, कोणाशी बोलतात, कोणत्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आहेत, याकडे पालकांनी लक्ष द्यावे.

**मोबाईल जोडतोय की तोडतोय नाती?**

**मोबाईल तपासा, पण विश्वासही जपा!**

मुलांच्या मोबाईलचा वापर तपासताना त्यांचा विश्वास दुखावला जाणार नाही, याची काळजी घ्या. संशय घेण्यापेक्षा मुलांशी मित्रत्वाचे नाते निर्माण करा. प्रेम, विश्वास आणि संवादातून त्यांना चांगल्या-वाईट गोष्टींची जाणीव करुन द्या. पालकांनी मुलांच्या मोबाईल वापराबाबत घरात स्पष्ट नियम ठरवावेत. सोशल मीडिया वापरण्याचे वय, वेळ आणि सुरक्षिततेचे नियम समजावून सांगावेत.

अनोळखी व्यक्तींशी वैयक्तिक माहिती, फोटो किंवा व्हिडिओ शेअर करु नयेत, हे मुलांना पटवून द्यावे.

**ही लक्षणे दिसली तर सावध व्हा :-** मुलगा किंवा मुलगी अचानक मोबाईल लपवू लागला, सतत पासवर्ड बदलू लागला, रात्री उशिरापर्यंत चॅटिंग करु लागला, फोन आला की घरच्यांपासून दूर जाऊन बोलू लागला, मोबाईल काढून घेतल्यावर अस्वस्थ होऊ लागला, मुलांच्या वागण्यात अचानक बदल, अभ्यासाकडे दुर्लक्ष, एकटेपणा किंवा घरच्यांशी संवाद कमी होणे, मुलांवर बंधने नको, संवाद हवा! मुलांवर केवळ बंधने घालण्यापेक्षा त्यांच्याशी बोला, त्यांचे मित्र बना आणि त्यांच्या जगात काय सुरु आहे हे समजून घ्या. आज पालकांनी थोडेसे लक्ष दिले, संवाद साधला आणि मोबाईलच्या वापरावर योग्य नियंत्रण ठेवले, तर उद्याचा मोठा अनर्थ टाळता येऊ शकतो. मोबाईल मुलांच्या हातात द्या; पण मोबाईलमुळे मुलं तुमच्या हातातून निसटणार नाहीत, याची काळजी घ्या.



**डॉ.शिवा माया पुंडकर**
**मनोविकास तज्ञ,संमोहन तज्ञ,**
**पुरस्कार प्राप्त समुपदेशक व प्रशिक्षक अमरावती (वरुड )**
**७३७८८६६५५५**

# मन हा मोगरा! मन हा मोगरा!

**मन हा मोगरा!**
**मन हा मोगरा! अर्पुनी ईश्वरा!**
**पुनरुपी संसारा येणे नाही,!**

मनाचे महात्म्य एवढे थोर आहे मन हे अतिशय चंचल आहे अर्जुनाने श्रीकृष्णाला प्रश्न केला की ईश्वराची उपासना करण्याकरता एकाग्रचित्त आवश्यक आहे परंतु ते अतिशय चंचल असल्यामुळे त्याला वश करता येत नाही. श्रीकृष्णाने त्याला सततच्या अभ्यासाने ताब्यात घेता येते असा विचार सांगितला मनावर बुद्धीचे नियंत्रण हवे म्हणजेच इंद्रिय संयमीत केली की मनावर ताबा मिळवता येतो, मन हे फुलपाखरासारखे आहे त्याला भटकू देऊ नये त्याला कुठल्याही प्रकारचा छंद जोपासावा लागतो माळी ज्याप्रमाणे पाणी जिकडे नेईल तिकडे पाणी जाते त्याप्रमाणे त्याला योग्य ठिकाणी वळवता येते; मनपी रथावर बसून श्रवणाद्वारे बाहेर निघून शब्दरूपी रानात संचार करते तो प्रकृतीचा लगाम हातात धरून त्वचेच्याद्वारे स्पर्श रुपी घोर वनात जातो एखाद्या वेळेस नेत्राच्या द्वारे बाहेर पडून रूप विषयाच्या डोंगरावर स्वच्छंदाने हिंडतो किंवा जिभेच्या द्वाराने बाहेर पडून रसाच्या गुहेत किंवा जीवनाच्या द्वाराने बाहेर पडून सुगंधाच्या करण्यात फिरतो याप्रमाणे देह व इंद्रिय यांचा नायक जे मन ते धरून पंचेंद्रियाचे विषय जे शब्दादिक यांचा उपभोग घेतो असा मनाचा व इंद्रियाचा निकट चा संबंध आहे असे माऊली ज्ञानेश्वर महाराज म्हणतात गीतेमध्ये कृष्णाच्या सारथी रूपात मनाला उपमा दिली आहे आणि त्याला जोडलेले दहा घोडे म्हणजे इंद्रिय आणि या दहा इंद्रियावर निग्रह ठेवणे आवश्यक आहे मन हे आपल्या शरीराचा अमृत कलश आहे जीवनात मनाशी कधीही हारु नये,! मन के हारे हार है! जीते जीत! आपल्याजवळ मानसिक शक्ती असेल तर असफलतेवर आपण मात करु शकतो वैज्ञानिकांनी हृदयाला शोधून काढलं पण मन शोधता आलं नाही; मानव मनुष्य व मानवता हे सर्व मनामुळेच आहे आपल्याला मनाचे महत्त्व मानवी जीवनात अतिशय महत्त्वाचे आहे म्हणून मनाला खतपाणी घालण्याकरता वारंवार सत ग्रंथाचे वाचन चरित्राचे वाचन श्रवण मनन हे करणे आवश्यक आहे मनाची शक्ती एवढी भरभक्कम आहे की मन हे जर परमेश्वराला समर्पित केले तर या संसार चक्रातून माणसाची सुटका होते व मनुष्य ईश्वर सुद्धा बनू शकतो एवढी शक्ती मनाची आहे पण या सर्व गोष्टीला सततचा अभ्यास आवश्यक आहे दोन मन असतात एक बहिर्मन व दुसरे अंतर्मन; पण हे कधीच खोटे बोलू शकत नाही ते आपल्याला चांगल्या मार्गावर नेण्याचा वारंवार सूचना देत असतात.



**पुष्पा वरखेडकर**
**वरुड**
**मोबा.९४०४८६०११३**

# स्व.मधुकर ठाकरे यांच्या रुपाने मार्गदर्शक हरविला

स्व.मधुकरराव ठाकरे वयाच्या ९२ वर्षी अल्पशा आजाराने यांच निधन झाल्याची दुःखद वार्ता कळताच मन अत्यंत व्यथित झाले. हे दुःख केवळ आपल्या कुटुंबाचे नसुन, संपूर्ण समाजासाठीही मोठी हानी आहे.

पिता म्हणजे केवळ एक व्यक्ती नसते ते कुटुंबाचा आधार, जीवनाला दिशा देणारी शक्ती आणि प्रत्येक संततीसाठी अदृश्य कवच असतात. त्यांच्या सहवासातुन जीवनाला बळ मिळते, त्यांच्या शब्दांतून मार्गदर्शन मिळते आणि त्यांच्या अस्तित्वातुन आत्मविश्वास निर्माण होतो. आज जीवनाचा हा भक्कम आधार शारीरिक रूपाने आपल्या सोबत नसल्याने घरातील



प्रत्येक कोपरा, प्रत्येक आठवण आणि प्रत्येक क्षण त्यांच्या अनुपस्थितीची जाणीव करून देत राहील. मात्र, महान व्यक्ती कधीच खऱ्या अर्थाने आपल्यातून दुर जात नाहीत. त्यांच्या विचारांमधून कर्तृत्वातून संस्कारांमधुन आणि त्यांच्या संततीच्या रूपाने ते सदैव जिवंत राहतात. स्व.मधुकरराव ठाकरे यांचे जीवन शिस्त प्रामाणिकपणा परिश्रम आणि साधेपणाचा सुंदर संगम होते. आपल्या कर्तृत्वाने विचारांनी आणि उत्तम आचरणाने त्यांनी समाजात मानाचे स्थान निर्माण केले त्यांनी आपल्या कुटुंब आणि समाजावर केलेले संस्कार निश्चितच पुढील पिढ्यांना मार्गदर्शन आणि प्रेरणा देत राहतील. आई-वडिलांची माया ही आयुष्यभराची सावली असते. संकटाच्या काळात त्यांचे अस्तित्वच मनाला आधार देते. आज ती सावली आपल्यापासुन दुर झाली आहे त्यामुळे निर्माण झालेली पोकळी शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. त्यांची मुक प्रेरणा, प्रेमळ स्मित, आणि आशीर्वादाची अनुभुती सदैव आपल्या परिवारासोबत राहील, हीच या दुःखद प्रसंगी आपल्यासाठी सांत्वनाची बाब आहे.



**प्रमोद गणोरकर**
**माजी प्राचार्य**
**जागृत विद्यालय,**
**वरुड**

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# किडनीवर परिणाम, युरिन इन्फेक्शन, थोडा विसरण्याचा त्रास होऊ शकतो

## अण्णा हजारेंच्या प्रकृतीबाबत डॉक्टरांकडून अपडेट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अहील्यानगर** – ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना सोमवारी रात्री तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.



मुंबईतील प्रसिद्ध बॉम्बे हॉस्पिटलच्या आयसीयू विभागात त्यांना दाखल करण्यात आले होते. अण्णा हजारे यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉ.गौतम भन्साळी यांनी मंगळवारी प्रसारमाध्यमांना अण्णांच्या प्रकृतीबाबत माहिती दिली. त्यांची प्रकृती सुधारल्यास येत्या तीन–चार दिवसांत अण्णा हजारे यांना रुग्णालयातून घरी सोडले जाईल, असे डॉ.गौतम भन्साळी यांनी म्हटले. मात्र, यावेळी डॉक्टरांनी अण्णा हजारे यांच्या प्रकृतीच्या अनेक समस्यांबाबतही माहिती दिली. अण्णा हजारे यांना सोमवारी रात्री साडेआठ वाजता रुग्णालयात भरती करण्यात आले.

त्यांना ३ ऑगस्टपासून व्हायरल इन्फेक्शन झाले होते. सिरीयल डिहायड्रेशन झाले आहे. बराच काळ व्हायरल इन्फेक्शन असल्याने त्यांना युरिन इन्फेक्शनही झाले आहे.

# हिंदी भाषा आक्रमणाविरोधात मनसे–कन्नड रक्षक वेदिके मैदानात

## कर्नाटकात ठरला 'रोडमॅप', दिल्लीत महाअधिवेशन होणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मराठी भाषा , मराठी अस्मिता आणि महाराष्ट्र धर्मासाठी लढा देणारी महाराष्ट्र नवनिर्माण सेना तसेच कानडी भाषा व भाषिक हक्कांसाठी कट्टरपणे लढणारी 'कन्नड रक्षक वेदिके'या दोन्ही संघटना हिंदी भाषेच्या आक्रमणा विरोधातआता एकत्र आल्या आहेत.

कर्नाटकात पार पडलेल्या एका अत्यंत महत्त्वाच्या बैठकीत दोन्ही संघटनांच्या नेत्यांनी संयुक्त आंदोलनाचा आणि लढा उभारण्याचा रोडमॅप निश्चित केला आहे. या बैठकीस महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे, मनसे सरचिटणीस योगेश परुळेकर आणि कन्नड रक्षक वेदिकेचे प्रदेशाध्यक्ष टी. ए. नारायण गौडा यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत कर्नाटक, महाराष्ट्र तसेच देशातील इतर राज्यांमध्ये भाषा, सांस्कृतिक अस्मिता आणि बदलती लोकसंख्या यामुळे निर्माण होत असलेल्या विविध आव्हानांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत घेण्यात आलेले प्रमुख निर्णय – सर्व प्रादेशिक भाषांच्या रक्षणासाठी 'इंडियन लँग्वेजेस फोरम' या संयुक्त मंचाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. – भारतीय भाषांचे हक्क, अस्मिता आणि हितसंबंधांच्या संरक्षणासाठी एक विशेष १० कलमी 'कॉमन मिनिमम प्रोग्राम' तयार करून तो लवकरच प्रसिद्ध केला जाईल.

# नाशिक–त्र्यंबकेश्वरचा कायापालट होणार!

## सिंहस्थ कुंभमेळ्यावर तब्बल ३५ हजार कोटींचा खर्च

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

*नाशिक–त्र्यंबकेश्वर* – हिंदू धर्मीयांच्या आस्थेशी जोडलेल्या कुंभमेळ्याने गतवर्षी प्रयागराजमध्ये गर्दीचे नवे विक्रम प्रस्थापित केले. आता २०२७ मध्ये नाशिक–त्र्यंबकेश्वर येथे होणारा सिंहस्थ कुंभमेळा खर्चाच्या बाबतीत नवा विक्रम नोंदवणार आहे. मागील १२ वर्षांत देशात झालेल्या सहा कुंभमेळ्यांवर झालेल्या एकूण खर्चाच्या तुलनेत यंदाचा खर्च कित्येक पटीने अधिक असणार आहे. तब्बल ३५ हजार कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधांनी नाशिक–त्र्यंबकेश्वरचा सिंहस्थ कुंभमेळा सजणार आहे. या निधीपैकी सर्वाधिक ५१ टक्के



निधी रस्ते बांधणी आणि रस्ते विकासासाठी खर्च केला जाणार आहे. तर इमारती आणि संस्थात्मक पायाभूत सुविधांसाठी नऊ टक्के, पूल आणि उड्डाणपुलांसाठी आठ टक्के निधी खर्च होणार आहे. कुंभमेळ्यात तब्बल १२ कोटी भाविक ? २०२५ मध्ये प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभात गर्दीचे आजवरचे अनेक विक्रम मोडीत निघाले. अपेक्षेपेक्षा तब्बल पाचपट भाविक या कुंभमेळ्यात सहभागी झाले होते. आता २०२७ मध्ये नाशिक–त्र्यंबकेश्वर येथे पुढील कुंभमेळा होत असून, या सिंहस्थ कुंभमेळ्यात तब्बल १२ कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या संभाव्य गर्दीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर नियोजन आणि जय्यत तयारी सुरू आहे. राज्य आणि केंद्र सरकार तसेच नाशिक महापालिकेकडून तब्बल ३५ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून बाधित नवजात बालकांच्या प्रकृतीची विचारपूस : जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनाग्रस्त कक्षाची पाहणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

*अमरावती* – जिल्हा स्त्री रुग्णालयातील २४ ऑगस्ट रोजी घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेतील बाधित बालकांची राज्याचे महसूल व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन आस्थेने विचारपूस केली. त्यांनी पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (पीडीएमसी) तसेच मुरके हॉस्पिटलला भेट देऊन उपचारधीन बालकांच्या आरोग्याची माहिती घेतली, तसेच जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनाग्रस्त नवजात अतिदक्षता विभागाची पाहणी केली. पीडीएमसी आणि मुरके रुग्णालयात उपचार घेत





असलेल्या काही नवजात बालकांची प्रकृती धोक्याबाहेर आल्याने त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे, तर उर्वरित बालकांवर विशेष डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. पालकमंत्री बावनकुळे यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून बालकांच्या उपचाराबाबत मार्गदर्शन केले. तसेच, उपचाराधीन बालकांच्या माता–पित्यांची भेट घेऊन त्यांना धीर देत 'राज्य शासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे,' असा विश्वास दिला.

त्यानंतर पालकमंत्र्यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनाग्रस्त कक्षाची पाहणी करून प्रशासकीय अधिकारी आणि वरिष्ठ डॉक्टरांकडून दुर्घटनेची सविस्तर माहिती घेतली. दुर्घटनेच्यावेळी जीवाची बाजी लावून नवजात बालकांना अतिदक्षता विभागातून सुखरूप बाहेर काढणाऱ्या परिचारकांशी त्यांनी चर्चा केली व माहिती जाणून घेतली. यावेळी रुग्णालयातील सुरक्षितता आणि आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्यादृष्टीने त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. या पाहणी दौऱ्याप्रसंगी खासदार डॉ.अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त मंगेश गोंदावले, पोलीस आयुक्त राकेश ओला आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.विनोद पवार यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# शिक्षकांना सलाम करणारी मुंबई उपनगरातील सर्वात मोठी मानाची 'सन्मान दहीहंडी २०२६' : ११ लाख ११ हजार ३१६ रुपयांचं पारितोषिक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – शिवसेना पुरस्कृत आणि शिवसेना नगरसेवक किरण भाऊ लांडगे यांच्या नेतृत्वाखाली 'किरण भाऊ लांडगे मित्र परिवार' आयोजित भव्य 'सन्मान दहीहंडी २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. या वर्षीची दहीहंडी



अत्यंत विशेष असून ही शिक्षकांना सलाम करणारी आणि समर्पित असणारी पहिलीच मानाची दहीहंडी ठरणार आहे. या सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. गोविंदा पथकांसाठी रुपये ११ लाख ११ हजार ३१६ रुपयेचे भव्य पारितोषिक ठेवण्यात आले आहे. शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या आणि ज्ञान व यशाची उंच गुढी उभारणाऱ्या या दहीहंडी उत्सवाला नागरिकांनी व गोविंदा पथकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नगरसेवक किरण भाऊ लांडगे यांनी केले आहे.

कसा असेल कार्यक्रम–कार्यक्रम तपशील दिनांक: शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ वेळ: दुपारी १ वा. ते रात्री १० वा. स्थळ: नगरसेवक किरण भाऊ लांडगे जनसंपर्क कार्यालय, असल्फा, अंधेरी–घाटकोपर लिंक रोड, घाटकोपर (पश्चिम), मुंबई.


आयोजक : किरण (भाऊ) लांडगे मित्र परिवार व शिवसेना प्रमुख उपस्थिती व आकर्षण: या सोहळ्यात मनोरंजन क्षेत्रातील अनेक सुप्रसिद्ध कलाकार व सेलिब्रिटीज विशेष उपस्थिती लावणार आहेत: अमृता खानविलकर (सुप्रसिद्ध मराठी चित्रपट अभिनेत्री) डरालरींर (संबाता) (सुप्रसिद्ध रॅपर) आफताब शिवदासानी (हिंदी चित्रपट अभिनेता) सोनल चौहान (बॉलिवूड अभिनेत्री) श्वेता त्रिपाठी (प्रसिद्ध अभिनेत्री) आयेशा खान (अभिनेत्री व मॉडेल) कुबेरा सेट.

# परदेशात फिरायला जाऊ नका, विदेशात लग्नसोहळे टाळा, गरज पडलं तरचं सोनं विकत घ्या

## पंतप्रधान मोदींचा नवा कानमंत्र

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***वरुड*** – भारतीय अर्थव्यवस्थेने चालू आर्थिक वर्षातील एप्रिल ते जून या तिमाहीत ७.८ टक्के इतका विकास दर नोंदवल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी देशवासियांचे आभार मानले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी मंगळवारी सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर करत देशवासियांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी देशवासियांना एक महत्त्वाचे आवाहन केले. देशाचा आर्थिक विकासदर सध्या चांगला आहे. ही गती कायम ठेवायची असेल तर



आपल्याला स्वदेशी आणि आत्मनिर्भर भारत या दोन धोरणांचा अधिकाअधिक अवलंब करावा लागेल. त्यासाठी परदेशातील प्रवास टाळा. विदेशात जाऊन लग्नसोहळे करणे टाळा, असा सल्ला पंतप्रधान मोदी यांनी दिला. तसेच गरज नसेल तर सोनं खरेदी करु नका, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. भारतीय अर्थव्यवस्थेने ७.८ टक्के इतका आर्थिक विकासाचा दर नोंदवला. यासाठी देशवासियांना खूप खूप शुभेच्छा. संपूर्ण देश आनंदाने भरुन गेला आहे. हे जनतेच्या पुरुषार्थ, संकल्पशक्ती आणि सामूहिक शक्तीचे प्रतीक आहे. संपूर्ण जग युद्धात बुडालं आहे. चारही बाजूंनी संकटांच्या बातम्या येत आहेत. जगभरातील पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. कोरोनानंतर जगभरात कुठेही स्थिरता नाही. तरीही भारत इतक्या वेगाने प्रगती करत आहे. भारतामधील निराशेच्या गर्तेत बुडालेले काही लोक 'झुठ की गुंज'च्या माध्यमातून चारही दिशांना अपप्रचार करत आहेत. मात्र, या सगळ्याला पार करून, हे निराशेचे वातावरण भेदून भारतीय अर्थव्यवस्थेने ७.८ टक्के इतका आर्थिक विकासदर नोंदवला.

## बालकांच्या पालकांना ५ लाखांचा धनादेश प्रदान

# अतिदक्षता विभागाची नव्याने उभारणी करु : पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)


*अमरावती* – जिल्हा स्त्री रूग्णालयातील आगीमध्ये ३ बालकांचा मृत्यू झाला आहे. ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. याठिकाणचा अतिदक्षता विभाग हा गरजूंसाठी महत्वाचा असल्याने अत्याधुनिक आणि सुसज्ज अतिदक्षता विभागाची नव्याने उभारणी करण्यात येईल, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

पालकमंत्री बावनकुळे यांनी डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय मुरके हॉस्पीटल आणि जिल्हा स्त्री रूग्णालयाला भेट दिली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी खासदार डॉ.अनिल बोंडे, आमदार प्रविण पोटे, रवी राणा,



जिल्हाधिकारी आशिष येरेकर आदी उपस्थित होते.

पालकमंत्री बावनकुळे यांनी, रूग्णालयातील आपत्कालीन वेळेत नवजात शिशूंचे जीव वाचविणे ही प्राथमिकता होती. ३६ बालकांना तातडीने खासगी रूग्णालयात हलविण्यात आले. त्यांच्यावर यशस्वी उपचार झाल्याने या सर्व बालकांची प्रकृती आज ठिक झाली आहे. तसेच घटनेनंतर जिल्हा प्रशासनाशी सातत्याने संपर्कात राहून परिस्थितीवर नियंत्रण मिळिवण्यात यश मिळिवले आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात



घेऊन आरोग्य मंत्र्यांनी त्याच? दिवशी भेट देऊन चौकशी समितीची घोषणा केली आहे. आरोग्य आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या अहवालानंतर दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल. मात्र भविष्यात अशा प्रकारच्या घटना होऊ नये, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. जिल्हा स्त्री रूग्णालयाला गेल्या दोन वर्षात आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देण्यात आला. यावर्षी या रूग्णालयाचा कोणताही प्रस्ताव जिल्हा नियोजन कार्यालयाकडे प्रलंबित नाही. रूग्णालयातील प्रस्तावांबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती असून या समितीकडून छाननी केल्यानंतरच प्रस्ताव नियोजनकडे सादर केले जातात. येत्या कालावधीत अतिदक्षता कक्ष हा एम्सच्या मानकानुसार तयार करण्यात येईल. याठिकाणी जागतिक दर्जाचे उपकरणे बसविण्यात येतील. यात कोणतीही त्रृटी राहणार नाही, याची दक्षता घेतली जाईल. जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी निधीची करतरता भासू देणार नसल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. यावेळी स्वप्नील बोरंगे, प्रफुल्ल चोपडे, गंगाराम बेठेकर या पालकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहिर केलेल्या पाच लाख रूपयांचा धनादेश पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. तसेच खासगी रूग्णालयांनी शिशूंवर मोफत उपचार केल्याबद्दल आभार मानले.

# महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेसाठी २५ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन प्रवेशिका सादर करण्याचे आवाहन

## हौशी मराठी, हिंदी, संगीत, संस्कृत तसेच बालनाट्य व दिव्यांग बाल नाट्य स्पर्धांचा समावेश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने दि.१६ नोव्हेंबर, २०२६ पासून सुरु होणाऱ्या हौशी मराठी, हिंदी, संगीत व संस्कृत राज्य नाट्य स्पर्धांसाठी तसेच बालनाट्य स्पर्धा व दिव्यांग बालनाट्य स्पर्धांसाठी नाट्य संस्थांकडून दिनांक २५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने प्रवेशिका मागविण्यात येत असल्याची माहिती प्रशांत खेडेकर, संचालक, सांस्कृतिक कार्य यांनी दिली.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे खेडेकर यांनी नमूद केले आहे.

२३ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी डिसेंबर, २०२६ पासून विविध १० केंद्रांवर तर ६५ व्या हौशी हिंदी, संगीत व संस्कृत नाट्य स्पर्धेची अंतिमफेरी प्रत्येकी एका केंद्रावर डिसेंबर, २०२६ पासून आयोजित करण्यात येणार आहे.

नोंदणीकृत हौशी नाट्य संस्थांना तसेच गतवर्षी राज्यनाटय स्पर्धेत सहभागी झालेल्या नाट्य संस्थांना स्पर्धेसाठी विहित नमुन्यातील प्रवेशिका, नियम संचालनालयाच्या https://mahanatyaspardha.com या वेबसाईटवर ऑनलाईन उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रासह प्रवेशिका दि. २५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत ऑनलाईन सादर कराव्यात.

विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेशिका स्विकारल्या जाणार नाहीत. प्रवेशिकेसोबत आवश्यक असणारी कागदपत्रे जोडलेली नसल्यास किंवा संपूर्ण तपशिल भरला नसल्यास ऑनलाईन प्रवेशिका भरता येणार नाही.

स्पर्धेसाठी संस्थेची निवड झाल्यानंतर संस्थेने शासनाने निश्चित केलेल्या केंद्रावर व दिलेल्या तारखेस प्रयोग सादर केला नाही, तर त्यांची प्रवेशिकेसोबत भरलेली अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. नाट्यस्पर्धेकरीता संस्थांना शासन नियम बंधनकारक राहतील. नियमांचे उल्लंघन केल्यास संस्थेला अपात्र ठरविण्यात येईल.

राज्यातील जास्तीत जास्त नाटय संस्थांनी महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रशांत खेडेकर, संचालक, सांस्कृतिक कार्य यांनी केले आहे.

# भारतीय तांदळाला जागतिक स्तरावर मागणी

## १३८ देशांतील ३,३१७ खरेदीदारांची नोंदणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – राजधानी दिल्लीत २३ ते २५ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या 'भारत इंटरनॅशनल राइस कॉन्फरन्स २०२६' साठी ३० ऑगस्टपर्यंत १३८ देशांमधील ३,३१७ खरेदीदारांनी नोंदणी केली आहे. ही बाब भारतीय तांदळाच्या विविध प्रकारांना जगात असणारी मोठी मागणी दर्शवते.

शेजारील देश बांगलादेशमधून सर्वाधिक ३३६ खरेदीदारांनी नोंदणी केली आहे. त्यापाठोपाठ बेनिन (१७९), नायजेरिया (१७७), संयुक्त अरब अमिराती (१४५), नेपाळ (१३७), फिलिपिन्स (१३७), इथिओपिया (१२७), सौदी अरेबिया (१२५), इंडोनेशिया (१०९) आणि दक्षिण आफ्रिका (१०९) यांचा क्रमांक लागतो.

सामान्य नेटवर्किंगऐवजी प्रत्यक्ष व्यावसायिक करार व्हावेत यासाठी आयोजकांनी विशेष ॲप-आधारित 'बी२बी मॅचमेकिंग' सुविधा उपलब्ध केली आहे. यामुळे तांदळाचे प्रकार, गुणवत्ता, प्रमाण आणि बाजाराच्या गरजेनुसार खरेदीदार आणि निर्यातदारांना आधीच बैठका निश्चित करता येतील. महत्त्वाची बाजारपेठ आणि नवीन संधी बेनिन, नायजेरिया, इथिओपिया, सेनेगल, केनिया, यूएई, सौदी अरेबिया हे भारतीय तांदळासाठी महत्त्वाचे आयातदार ठरत आहेत. फिलिपिन्स, इंडोनेशिया आणि मलेशियामधील खरेदीदारांच्या सहभागामुळे आग्नेय आशियाई बाजारात भारतीय निर्यातदारांना पकड मजबूत करण्याची संधी मिळेल.

परिषदेमुळे भारतीय तांदूळ निर्यातदारांचे एकाच बाजारावरील अवलंबित्व कमी होऊन १.८ लाख कोटींच्या संभाव्य जागतिक बाजारपेठेत प्रवेश करण्याचे मार्ग मोकळे होतील.

# 'देवाभाऊ हे संजय राऊतांसारख्या माफियांचे कर्दनकाळ' : नवनाथ बन यांचा जोरदार हल्लाबोल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नेते संजय राऊत यांच्यातील राजकीय आरोप-प्रत्यारोप पुन्हा एकदा तीव्र झाले आहेत. भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी संजय राऊत यांच्यावर जोरदार टीका करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे समर्थन केले.

भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना नवनाथ बन म्हणाले की, महाराष्ट्रातील माफियागिरी संपवण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. तुमच्यासारख्या माफियांचा कर्दनकाळ होत महाराष्ट्र माफियामुक्त करण्याचे काम देवाभाऊंनी केले आहे.

'तुमच्या भोंग्याची हवा निघून गेली' : संजय राऊत यांच्या वक्तव्यांवर टीका करताना बन यांनी म्हटले की, संजय राऊत, तुमचा भोंगा सनईसारखा नाही, तुम्ही राहुल गांधींचा पोंगा वाजवण्याचे काम करत आहात. फडणवीस यांनी राऊत यांच्या कथित 'फेक नॅरेटिव्ह'चा भांडाफोड केला असून त्यांच्या आरोपांची हवा निघून गेल्याचा दावा बन यांनी केला. फडणवीस यांनी राऊत यांच्या भूमिकेची चिरफाड केल्याचेही त्यांनी म्हटले.

उद्धव ठाकरेंवरही निशाणा : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी जनतेचे आशीर्वाद असल्याचा दावा करत नवनाथ बन यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला. अभिजीत दीपके यांच्याबाबत उद्धव ठाकरे यांनी केलेल्या कथित वक्तव्यावर संजय राऊत यांनी भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी त्यांनी केली. मोदींच्या फोटोवरून अमित ठाकरेंना आव्हान : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो हटवल्याच्या मुद्द्यावरून बन यांनी मनसे नेते अमित ठाकरे यांच्यावरही टीका केली. छत्रपती शिवाजी महाराज आम्हाला वंदनीय आहेत. ते हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आहेत, असे सांगत मोदी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या छायाचित्रांमध्ये तुलना करण्यात आली नसल्याचे त्यांनी म्हटले.

# जळगावमध्ये ३० लाख ३७ हजार मतदार : प्रारुप मतदार याद्या जाहीर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**जळगाव** – विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने आज ३१ ऑगस्टला प्रारुप मतदार यादी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी प्रसिद्ध केली.

यावेळी उपजिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणुक अधिकारी अर्चना मोरे या उपस्थित होत्या.

जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार जिल्ह्याची प्रारूप मतदार यादीनुसार मतदार संख्या ३० लाख ३७ हजार ४५६ आहे. यात पुरुष संख्या १५ लाख ६७ हजार ३७५ असून महिला मतदार १४ लाख ६९ हजार ९९७ तर तृतीयपंथी ८४ मतदार आहेत. ज्या मतदारांनी गणनापत्रक बीएलओकडे जमा केलेले नाहीत, अशा ५ लाख १४ हजार ८३६ मतदारांची नावे प्रारुप मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. यात ९३७०९ हे मयत मतदार असून २ लाख ६२ हजार ५४५मतदार हे कायमसवरूपी स्थलांतरित झाले आहेत. दुबार नोंदणी झालेले ६१ हजार ३४ असून ९५८०८ मतदार गणनापत्रकावेळी गैरहजर होते.

जिल्हयात सर्वात जास्त मतदार हे चाळीसगावमध्ये असून त्यांची संख्या ३ लाख २० हजार ८७२ आहे. पाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर जामनेर मतदारसंघात २ लाख ९६ हजार ६२६ मतदार आहेत तर पाचोरा मतदार संघात २ लाख ९० हजार १५२ मतदार आहेत. सर्वात कमी मतदार भुसावळ मतदारसंघात २ लाख ३४ हजार ३९१ मतदार आहेत.

मतदारांपाठोपाठ मतदार केंद्राचे सुसूत्रीकरण करण्यात येत असून पूर्वी ३६७७ मतदार केंद्रे होती आता ३७०२ मतदारकेंद्रे प्रस्तावित असल्याची माहिती जिल्हाधिकारी घुगे यांनी दिली.

# उरणमध्ये युरियाची टंचाई : कृषी विभागाचा बेजबाबदारपणा

## शेतकरी हवालदिल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**उरण** – तालुक्यात सध्या युरिया खताचा तीव्र तुटवडा निर्माण झाला असून हक्काच्या खतासाठी शेतकऱ्यांना कृषी सेवा केंद्रांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. या वर्षी पाऊस समाधानकारक झाल्याने उरण तालुक्यातील भातपिके उत्तम स्थितीत असून सध्याच्या काळात पिकांना खताची अत्यंत गरज आहे. मात्र, तालुक्यातील एकाही कृषी केंद्रावर खत उपलब्ध नसल्याने शेतकरी पूर्णपणे हतबल झाला आहे.

खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी आणि पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या उद्देशाने कृषी विभागाने १५ ऑगस्ट २०२६ पासून 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' (एफएफएस) ही नवीन ऑनलाइन खत विक्री प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीनुसार शेतकरी आयडी किंवा आधार कार्डच्या मदतीने ॲपवर लॉग इन करून पिकाच्या गरजेनुसार खताची मागणी नोंदवून मिळालेल्या क्यूआर कोड किंवा टोकन क्रमांकाद्वारे खत खरेदी करणे अपेक्षित आहे. परंतु ही ऑनलाइन पद्धत अत्यंत किचकट असून तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांकडे स्मार्टफोनच उपलब्ध नाहीत. त्यातच प्रत्यक्ष दुकानांमध्ये खत उपलब्ध नसल्याने या नव्या प्रणालीचा शेतकऱ्यांना कोणताही दिलासा मिळालेला नाही.

शेतकरी दुहेरी संकटात उरण तालुक्यातील बहुतांश शेतकरी हे अल्पभूधारक असून त्यांची शेती गुंठ्यांवर आधारित आहे. अशा परिस्थितीत संपूर्ण खताची पिशवी खरेदी करणे लहान शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसते. त्यामुळे पिकांच्या गरजेनुसार कमी प्रमाणात खत न मिळणे आणि त्यातच बाजारात खताचा तुटवडा असणे यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

शेतकऱ्यांमधून तीव्र संताप उरण तालुक्याच्या कृषी अधिकारी अर्चना सूळ ननावर यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी अत्यंत बेजबाबदारपणे कृषी केंद्र चालकांना खत उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत; परंतु ते विक्रेते खत आणण्यास नकार देत असल्याचे त्यांनी सांगितले.

भातशेती धोक्यात उरण तालुक्यातील कृषी विभागाच्या ढिसाळ आणि बेजबाबदार कारभाराबाबत शेतकऱ्यांच्या आधीपासूनच अनेक तक्रारी आहेत. शासनाच्या अनेक कल्याणकारी योजनांचा लाभही सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याचा आरोप होत आहे. ऐन पिकांच्या वाढीच्या काळात खतांचा तुटवडा आणि प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे उरणमधील भातशेती धोक्यात आली असून, आता खतासाठी दाहीदिशा भटकणाऱ्या शेतकऱ्यांनी दाद कोणाकडे मागावी, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर, साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७०७/२०२६ ने.ता. / /२०२६**

**अर्जदार :-**

१)श्रीमती कौसल्या किसना लाडे, वय अं.५८ वर्ष, धंदा-मजुरी
२) संदीप किसना लाडे, वय अं.४६ वर्ष, धंदा-शेती
३) गजानन किसना लाडे, वय अं.४० वर्ष, धंदा-शेती
क्र.१ ते ३ रा.एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती
४) सौ.जयश्री लिलाधर फुके, वय अं.४३ वर्ष, धंदा-घरकाम
रा.दिंदरगांव, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत किसना दौलतराव लाडे, रा.एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि. / /२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२७/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७०८/२०२६ ने.ता.२३/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) लता रामदास शेंडे, वय अं.३६ वर्ष, धंदा-व्यवसाय
२) भावना रामदास शेंडे, वय अं.२३ वर्ष, धंदा-शिक्षण
३) यश रामदास शेंडे, वय अं.१५ वर्ष, धंदा- शिक्षण
सर्व रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
(अर्जदार क्र.३ करीता अ.पा.क म्हणुन अर्जदार क्र.१ आई)

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रामदास नामदेवराव शेंडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२७/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# देव तारी त्याला कोण मारी...७५ वर्षीय आजीची दोन दिवस अंधाऱ्या विहिरीत मृत्यूशी झुंज



## २ दिवसांनी सुखरूप बाहेर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – देव तारी त्याला कोण मारी या म्हणीचा प्रत्यय चांदवड शहरातील नागरिकांना आला आहे. गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या एका ७५ वर्षीय आजीची दोन दिवस अंधाऱ्या विहिरीत मृत्यूशी झुंज यशस्वी ठरली आहे. २९ ऑगस्टपासून बेपत्ता असलेल्या चंद्रभागा धुळाजी व्हरकटे या आजी बसस्थानकाजवळील एका उघड्या विहिरीत पडल्या होत्या. तब्बल दोन दिवस अन्न-पाण्याविना काळोख्या विहिरीत अडकूनही त्यांनी मृत्यूशी झुंज देत स्वतःचा जीव वाचवला आहे.

# गोवा-दिल्ली इंडिगो विमानाचे आपत्कालीन लँडिंग

## इंजिनमध्ये बिघाड झाल्याने २२९ प्रवाशांचा जीव टांगणीला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**गोवा** – विमानतळावर तातडीने आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. विमानाच्या एका इंजिनमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाल्याचा संशय आल्यानंतर विमानतळावर 'फुल इमर्जन्सी' घोषित करण्यात आली होती. सुदैवाने, विमानाचे सुरक्षित लँडिंग झाल्याने मोठी दुर्घटना टळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, इंडिगोचे फ्लाईट नंबर ६ए २१०२ या विमानाने गोव्याच्या मनोहर आंतरराष्ट्रीय विमानतळावरून (मोपा) सकाळी ९:१६ वाजता दिल्लीसाठी उड्डाण केले होते. मात्र, उड्डाण केल्यानंतर अवघ्या १० मिनिटांत, म्हणजेच सकाळी ९:२५ वाजता विमानात तांत्रिक अडचण निर्माण झाल्याचे वैमानिकाच्या लक्षात आले. त्यानंतर तात्काळ आणीबाणी घोषित करण्यात आली आणि सकाळी ९:५० वाजता हे विमान पुन्हा गोव्यात सुरक्षित उतरवण्यात आले.

**२२९ प्रवासी सुखरूप**

या दिल्लीगामी विमानात एकूण २२९ प्रवासी सवार होते. विमानाचे इंजिन अचानक बंद पडल्याचे किंवा त्यात बिघाड झाल्याचे समजताच प्रवाशांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु वैमानिकाच्या प्रसंगावधानामुळे सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवण्यात आले.

# नवी मुंबईत एक्सपायरी डेट बदलणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश

## अन्न व औषध प्रशासनाकडून ७६ लाखांचा माल जप्त

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी मुंबई** – मुदत संपलेले खाद्यपदार्थ फेकून न देता, त्यांच्यावर नवीन तारखा छापून ते बाजारात विकणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा अन्न व औषध प्रशासनाने आणि नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. तुर्भे परिसरातील एका गोदामावर टाकलेल्या छाप्यात तब्बल ७६ लाख रुपयांहून अधिक किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

नामांकित कंपन्यांच्या स्नॅक्स आणि कोल्ड ड्रिंक्सचा साठा या कारवाईत दररोजच्या वापरातील अनेक लोकप्रिय खाद्यपदार्थांचा साठा सापडला आहे. यात नामांकित कंपन्यांचे वेफर्स, पोटॅटो चिप्स, नूडल्स, सूप, मायोनिजचे पॅकेट्स आणि नामांकित ब्रँड्सच्या शीतपेयांच्या कॅन्सचा समावेश आहे. हा सर्व माल ग्राहकांच्या आरोग्याशी थेट खेळणारा होता.

अशी केली जायची फसवणूक कारवाई दरम्यान अधिकाऱ्यांना या ठिकाणी



अतिशय धक्कादायक प्रकार पाहायला मिळाला. खाद्यपदार्थांच्या पॅकेटवरील मूळ उत्पादन तारीख आणि मुदत संपण्याची तारीख केमिकलच्या साहाय्याने पुसून टाकली जायची. त्यानंतर त्यावर नवीन तारखा छापून किंवा मूळ माहितीवर नवीन स्टिकर्स लावून मुदत संपलेला माल पुन्हा बाजारात विक्रीसाठी तयार केला जात होता.

# मुंबईत भीषण अपघात, भरधाव कारने २० जणांना उडवलं

## महिला वकिलाचा जागीच मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - मुंबईच्या पश्चिम उपनगरातील मालाड परिसरात एक भीषण अपघात घडल्याची माहिती समोर आली आहे. रविवारी रात्री घडलेल्या या भीषण अपघातामध्ये एक-दोन नव्हे तर तब्बल २० जण जखमी झाल्याची माहिती आहे. यापैकी एका महिला वकिलाचा मृत्यू झाला आहे. या महिलेचे नाव प्रियांका सत्रा असे आहे. तर आणखी एका व्यक्तीची प्रकृती गंभीर आहे. मालाड पश्चिम येथील रहिवासी असलेल्या ॲड. प्रियांका मयंक सत्रा यांचा जागीच मृत्यू झाला.



प्राथमिक माहितीनुसार, मालाड पोलीस ठाणे हद्दीत एस व्ही रोड, मामलेदार वाडी रोड जंक्शन येथे रविवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. सदर संदेश मिळताच सदर ठिकाणी ठाणे पोलीस उपनिरीक्षक जाधव, रात्रपाळी पोलीस निरीक्षक लोखंडे, स्टाफसह रवाना झाले. सदर ठिकाणी एमजी विन्सर क्रमांक चक ०२ ऋग २७२२ या वाहनाचा वाहनचालक नामे कृष्णा शांताराम चमनकर (वय ७०) याने तीन रिक्षा आणि एका दुचाकीला जोरदार धडक दिली.

या धडकेत बाईकस्वार आणि रिक्षात बसलेले पाच जण असे एकूण सहा जण जखमी झाले होते. या सगळ्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यापैकी एका महिला वकिलाचा मृत्यू झाला. यानंतर पोलिसांनी वाहनचालक कृष्णा चमणकर याला ताब्यात घेतले. त्याला तातडीने शताब्दी रुग्णालयात नेऊन त्याची तपासणी करण्यात आली. सदर घटनेत एक महिला मयत असून सदर बाबत तात्काळ मालाड पोलीस ठाणे गु. रजि. क्रमांक १४६९/२०२६ कलम १०६(१), २८१, १२५ (अ)(इ), भारतीय न्याय संहितासह कलम १८४ मोटर वाहन कायदा प्रमाणे नोंद करण्यात आला आहे. यातील आरोपीस सदर घेण्यात अटक करण्यात आली असून सदर अटक आरोपीस न्यायालयात हजर करण्यात आलेले आहे.

# अवघ्या ४० रुपयांसाठी थेट जीव घेतला!

## तरुण रिक्षाचालकाची निर्घृण हत्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी मुंबई** – अवघ्या ४० रुपयांच्या रिक्षा भाड्यावरून झालेल्या वादातून १८ वर्षीय रिक्षाचालकाची धारदार शस्त्राने हत्या केल्याची धक्कादायक घटना वाशी परिसरात घडली आहे.

हत्येनंतर आरोपी रिक्षा घेऊन फरार झाले होते. सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींच्या मदतीने पोलिसांनी दोन्ही आरोपींचा माग काढत त्यांना मानखुर्दमधून अटक केली.



साहिल आनंद सुर्वे (२०) आणि साहिल यशवंत खरात (२०), अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. दोघेही मानखुर्द येथील महाराष्ट्र नगर परिसरातील रहिवासी आहेत.

१४० रुपयांच्या भाड्यावरून वाद मृत रिक्षाचालकाचे नाव सुजनकुमार महातो असून ते घणसोली येथे राहत होते. २९ ऑगस्ट रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास कोपरखैराणे रेल्वे स्थानकाजवळ दोन्ही आरोपी महातो यांच्या रिक्षात बसले. त्यांनी मानखुर्दला जाण्यास सांगितले.

महातो यांनी प्रवासाचे भाडे १४० रुपये सांगितले. मात्र, आरोपींकडे केवळ १०० रुपये असल्याचे त्यांनी सांगितल्याने दोघांमध्ये वाद झाला. सेक्टर ५ येथील हनुमान मंदिराजवळ हा वाद आणखी वाढला. आरोपींनी धारदार शस्त्र दाखवून महातो यांना धमकावले आणि रिक्षा पुढे चालवण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे.

वाशीमध्ये धारदार शस्त्राने हल्ला रिक्षा वाशीतील फोर्टिस रुग्णालयाजवळील मिनी सीशोर गार्डन परिसरात पोहोचल्यानंतर महातो यांना दुसऱ्या ग्राहकाचा फोन आला. त्यामुळे त्यांनी आरोपींना रिक्षातून खाली उतरण्यास सांगितले. यानंतर पुन्हा वाद झाला. यावेळी दोन्ही आरोपींनी महातो यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला.

